जा.क्र.उमाशि-१/११वी प्रवेश/पुवि/२०१५-१६/८३९२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दि. 25 MAY 2015

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक विद्यालये,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र

विषय :- इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश प्रक्रिया सन २०१५-१६.
ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याबाबत...

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी वर्गातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहेत. गतवर्षी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया आपल्या सहकार्याने अत्यंत यशस्वीरीत्या पार पडली आहे. आपण केलेले सहकार्य व योगदान यामुळेच हे शक्य झालेले आहे.

सन २०१५-१६ मधील इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होत असून सदर प्रवेश प्रक्रिया सुलभरीत्या पूर्ण करण्यासाठी पुढील नियोजन व क्षेत्रीय कामांची पध्दती राबविण्याबाबत दि. २८.०५.२०१५ रोजी **असेंब्ली हॉल, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे** येथे सहविचार सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी विद्यार्थी / पालकांना काही शंका / अडचणी येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सदर शंका / अडचणी यांचे माध्यमिक / उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरून निराकरण करण्यासाठी आपणास आपल्या शाळेतील संगणकीय काम पाहणाऱ्या व्यक्तीची मदत घ्यायची आहे. तरी याबाबत आपण संगणकीय काम पाहणाऱ्या व्यक्तीसह सदर सभेसाठी उपस्थित राहावे. सभेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| झोन क्रमांक | झोनचे नांव | वेळ |
|---|---|---|
| १ | पुणे शहर विभाग | सकाळी ११ वाजता |
| २ | कर्वेनगर / कोथरूड विभाग | |
| ३ | पर्वती / धनकवडी / स्वारगेट | |
| ४ | सिंहगड रोड विभाग | |
| ५ | कॅम्प / येरवडा विभाग | |
| ६ | हडपसर विभाग | दुपारी २:३० वाजता |
| ७ | शिवाजीनगर / औंध / पाषाण विभाग | |
| ८ | पिंपरी - भोसरी विभाग | |
| ९ | चिंचवड निगडी विभाग | |

तसेच इ.११ वी केंद्रीय प्रवेश माहिती पुस्तिका तयार झाली असून आपण नोंदणी केलेल्या मुख्य केंद्रावर वितरण चालू आहे. तरी आपण केलेल्या नोंदणीनूसार सकाळी १०:०० ते दुपारी ०४:०० वाजेपर्यंत माहिती पुस्तिका घेऊन जावे व आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना रूपये १००/- प्रमाणे सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० या वेळेत वितरीत कराव्यात.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ तथा
अध्यक्ष
इ.११वी केंद्रिय प्रवेश समिती, पुणे